क्र.का.४/प्र.क्र.२७४३/६१७१ ते ६५२०
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय, पुणे
दिनांक :- २०.१०.१९९३

**विषय** :- **शासकीय कर्मचाऱ्यांच्या सहकारी गृह - निर्माण संस्थेने नोंदणी केलेल्या गहाणखतांच्या प्रमाणपत्राबाबत..**

## प रि प त्र क :-

शासकीय कर्मचाऱ्यांच्या सहकारी गृह निर्माण संस्थांना कर्जाचा पहिला किंवा दुसरा हप्ता मंजूर केल्यानंतर संस्थेची जमीन व त्यावरील इमारत शासनाकडे गहाण टाकण्याबाबतचे नोंदणी वृत्त गहाणखत शासनास सादर केल्याशिवाय शासन त्या संस्थेलासदरील कर्जाचे हपते मंजूर करीत नाहीत. नोंदणीकृत गहाणखते छायाचित्रणाकरीता पाठविण्यात आल्यावर संस्थेला ते तात्काळ मिळणे अडचणीचे होते. त्यामुळे सभासदांना कर्ज मंजूरीचे हप्ते मिळण्यास वेळ लागतो. शासकीय कर्मचाऱ्यांच्या गृहनिर्माण संस्थेची वरील अडचण दूर करणेसाठी असे आदेश देण्यात येत आहेत की, शासकीय कर्मचाऱ्यांच्या सहकारी गृह निर्माण संस्थेने, ज्यांना शासनाने कर्ज मंजूर केले आहे, त्यांनी गहाणखत नोंदणी करीता दुय्यम निबंधक यांचेकडे दाखल केल्यानंतर ज्या गहाणखताची नोंदणी होण्यास कायद्याच्या दृष्टीकोनातून काही अडचण नाही अशा दस्तऐवजांच्या बाबतीत संस्थेच्या, प्रतिनिधीला दस्तऐवजाची प्रमाणित नक्कल मिळणेबाबत अर्ज करण्यास सांगणे व योग्य ती फी आकारून नोंदणी झालेल्या गहाणखतांची प्रमाणित नक्कल आठ दिवसांत देण्यात यावी.

**का.प्र.मा.नों.म.नि.**
**यांचे सहीची असे.**

**सही /-**
**(सू.शा.माळी)**
**उप नोंदणी महानिरीक्षक,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे.**

**प्रति**

१) **सर्व दुय्यम निबंधक यांना माहितीकरीता व विहीत मुदतीत कार्यवाही करणे करीता रवाना.**
२) **दुय्यम निबंधक मुंबई व बांद्रा यांना माहितीकरीता व मुदतीत कार्यवाही करणेकरीता सस्नेह अग्रेषित.**
३) **सर्व सह जिल्हा निबंधक यांना माहितीकरीता अग्रेषित**
४) **सर्व सहाय्यक नोंदणी महानिरीक्षक यांना माहितीकरीता अग्रेषित**